नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २४/०९/२०२६ (गुरूवार)

.........................................................................................

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत श्वान पथकाच्या कौशल्यामुळे सदोष मनुष्यवधाचा गंभीर गुन्हा उघड , २ आरोपी अटक

पोलीस स्टेशन बोरी :— दिनांक १९/०९/२०२६ रोजी मृतक दिनेश श्रीराम मसराम, वय ४१ वर्षे, रा. आजनगाव, ता. हिंगणा, जि. नागपूर हे बेपत्ता झाल्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशन बोरी येथे प्राप्त झाल्याने सदर प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

बोरी पोलीस सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना आजनगाव जवळील जंगल शिवारात एका इसमाचा मृतदेह मिळून आल्याची माहिती प्राप्त झाली. पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ पाहणी केली असता सदर मृतदेह हा बेपत्ता असलेले दिनेश श्रीराम मसराम यांचा असल्याचे निष्पन्न झाले.सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा तसेच श्री मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली बोरी पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेची विविध पथके तयार करून तपास सुरू करण्यात आला.

मृतकाच्या शवविच्छेदन अहवालामध्ये विद्युत करंट लागल्याने मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी नमूद केले. त्याआधारे तपास करीत असताना घटनास्थळापासून काही अंतरावर आरोपी राजेंद्र मारोती पिंपळे, वय ४७ वर्षे व रविंद्र मारोती पिंपळे, वय ५२ वर्षे यांच्या शेताला विद्युत प्रवाह असलेले कुंपण असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याआधारे पुढील तपास करण्यात आला; मात्र सुरुवातीस आरोपींच्या सहभागाबाबत ठोस माहिती प्राप्त होत नव्हती.दरम्यान, मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक श्री अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २३/०९/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या श्वान पथकाकडून घटनास्थळाची तपासणी करण्यात आली.

यावेळी “मॅक श्वानाने” आरोपींच्या शेतापासुन मृतकाच्या मृतदेहाच्या ठिकाणापर्यंत सुमारे ३ किमीचा मार्ग दाखविला. श्वान पथकाने केलेल्या तपासणीतील निष्कर्ष व त्याआधारे करण्यात आलेल्या पुढील तपासातून सदर गुन्हयात वरील दोन्ही आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला. श्वान पथकाच्या कुशल तपासणीमुळे गंभीर स्वरूपाचा गुन्हा उघडकीस आला आहे.

सदर गुन्हयात नमूद दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १०५ अन्वये सदोष मनुष्यवधाचे कलम वाढविण्यात आले असून, दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. दिनांक २८/०९/२०२६ रोजी पर्यंत आरोपींचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे. पुढील तपास बोरी पोलीस करीत आहे.





## नागपुर ग्रामीण पोलीस दलाकडुन सन २०२६ च्या गणेश विसर्जन बंदोबस्ताची संपुर्ण तयारी

नागपुर ग्रामीण जिल्हयात सार्वजनिक गणेश विर्सजन दिनांक २९/०९/२०२६ रोजी पर्यंत होणार असुन विर्सजना दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी नागपुर ग्रामीण पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे. विर्सजन बंदोबस्तासाठी **अपर पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण यांच्यासह ०६ उपविभागीय पोलीस अधिकारी, ३१ पोलीस निरीक्षक, १३१ सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक तसेच १५८८ पोलीस अंमलदार असे एकूण १७०० पोलीस अधिकारी व अंमलदार बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त राज्य राखीव दलाचे ०१ प्लाटुन, नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे ०२ दंगा नियंत्रण पथक ( RCP) , २ जलद प्रतिसाद पथक (QRT) ६५० होमगार्ड तैनात करण्यात आलेले आहेत.** . तसेच गणेशोत्सव कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच

गर्दीच्या ठिकाणी घडणाऱ्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सर्व्हेलन्स व्हॅन तैनात करण्यात आल्या आहेत.

नागपुर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत कालीघाट आणि पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत माथनी घाट येथे मोठया प्रमाणात ग्रामीण आणि शहरी भागातील सार्वजनिक आणि घरगुती गणपतींचे विर्सजन करण्यात येते तसेच सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत गणपती विर्सजन होत असते. विसर्जना दरम्यान कोणताही अनुचित किंवा घातपाताचा प्रकार होवु नये म्हणुन घातपात विरोधी पथक ( BDDS ) ने जिल्यातील गर्दीचे ठिकाण ,रेल्वे स्टेशन, बस स्टॅड तसेच गर्दीच्या ठिकाणी तपासणी केली असुन बंदोबस्ताची पुर्वतयारी म्हणुन दहशतवादी विरोधी कक्ष यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयात संवेदनशील ठिकाणे धार्मिक स्थळे, रेल्वे स्टेशन तसेच फार्म हाउस ,लॉजेस ,झोपडपटटी परीसर आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी तपासणी केलेली आहे.

विर्सजनाच्या दिवशी नागरिकांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्याकरीता व्हिडीओग्राफी करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जना दरम्यान जे कोणी अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यावर त्वरीत प्रतिबंध घालता येईल. तसेच विर्सजन स्थळी लाईफ गार्ड दिलेले आहे. **विसर्जना स्थळावर स्थानिक प्रशासनातर्फे कृत्रिम तलावे तयार करण्यात आली आहे. गणेश मुर्ती विसर्जन हे नैसर्गिक नाले आणि तलावामध्ये न करता शासनाद्वारे तयार करण्यात आलेले कृत्रिम तलावामध्ये करणे अनिवार्य आहे.**

**सदर कालावधीत मोठ्या आवाजातील ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर, डॉल्बी आणि मल्टिपेअर साऊंड सिस्टिममुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी व रुग्णांच्या आरोग्याला गंभीर बाधा पोहोचू शकते. सार्वजनिक शांतता भंग होऊ नये आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये, यासाठी पोलीस विभागातर्फे नागपूर ग्रामीण जिल्ह्यात ध्वनी प्रदूषणाबाबत कडक निर्बंध लादले आहेत.**

**विसर्जन शांततेत पार पाडण्याकरीता मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी स्वत: महत्त्वाच्या विसर्जन मार्गाची पाहणी केली आणि विसर्जन स्थळावर भेट देवुन पाहणी करून सुचना दिल्या.**

# गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर सराईत गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक हद्दपार आदेश भारतीय नागरिक सुरक्षा संहीता कलम १६३(२) अंतर्गत ३४० सराईत गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध

**नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या हद्दीत आगामी सार्वजनिक गणेशोत्सव तसेच गणेशविसर्जन शांततेत, उत्साहात आणि कायदा व सुव्यवस्थेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस प्रशासनाने उत्सव काळात कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरूध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) अंतर्गत व्यापक प्रतिबंधात्मक हद्दपार कारवाई केली आहे.**

**गणेशोत्सवाच्या तसेच गणेश विसर्जनाच्या काळात अवैध दारू विक्री व इतर समाजघातक कृत्यांमुळे शांतता भंग होण्याची तसेच सार्वजनिक सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता लक्षात घेऊन मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात संबधित पोलीस स्टेशन यांनी उत्सव काळात कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणाऱ्या सराईत गुन्हेगारांना कलम १६३(२) भा.ना.सु.सं मधील तरतुदींनुसार सण—उत्सवाच्या कालावधीत ठराविक पोलीस स्टेशनच्या हद्दीत व विशिष्ट भागात येण्यास पूर्णपणे प्रतिबंध (हद्दपार) करण्याबाबत प्रस्ताव तयार करून संबंधित उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यालयात पाठविले. संबंधित उपविभागीय दंडाधिकारी यांनी असे प्रतिबंधात्मक हद्दपारीचे आदेश पारित केले आहेत.**

## उमरेड उपविभाग

**पोलीस स्टेशन उमरेड :—** पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत १)सुशिला जरत्तर पवार,२) अनिकेत गोविंदाजी लोखंडे, ३)सुनिल सुर्यभान कन्नाके, ४) शिवाजी विश्वनाथ धनविजय,५) धिरज किशोर मारसिंगे,६) मंदाबाई बापुराव जींजाळ ,७) उषाबाई चिंतामनजी शिवरकर, ८) ललीता सुरेशजी मुरकुटे ०९) बल्लु श्रावण राठोड, १०) विनोद श्रावण जाधव, ११) आनंद अमृत पाटील, १२) रोशन अशोक ठाकरे, १३) लक्ष्मण पांडुरंग चव्हाण,१४) वंश सुखदेव तांबे, १५) केवलराम रामाजी दिघोरे १६)सोनाबाई काशिराम दिघोरे, १७) अरविंद किर्तीजय वंजारी,१८) राकेश भाऊराव बावनगडे, १९) मोरेश्वर दिनबाजी मोहीनकर,२०) गोपिचंद फकरू मांढरे, २१) विमल गोपिचंद खेडकर, २२) प्रभाकर झिंगर मोहीनकर,२३) विक्की महेंद्रसिंग चंदेल ,२४) भारत फागुजी दिघोरे, २५) रघुविर शिवा मोहीनकर, २६) वैभव चंद्रमणी कांबळे, २७) धिरज पंचम मेश्राम, २८) सौ परनाला रामचंद पवार, २९) सुरती नारायणराव तेलरांधे,३०) फैमीदा मुस्ताक शेख,३१) फुलचना रामु पवार, ३२) छाया कांचन नाईक, ३३) मनोज शंकर नागपूरे, ३४) नत्थु तातोबा मेश्राम, ३५) व्यंकट एलय्या बडगेवार,३६) राज सुरजलाल सोलंकी, ३७) माधुरी प्रेमदास शेंडे, ३८) भावराव मारोती मंदिरकर,३९) प्रणय तेजराम दुधनकर, ४०) सैलेश रायभान बोरकर, ४१) मोहीत पद्माकर बोरकर, ४२) दयानंद राजेराम येवले, ४३) लक्की सचिन शिंदेकर ४४) सादीक ऊर्फ अड्डु उस्मान शेख,४५) धर्मेंद्र सोमाजी पौनिकर, ४६) विशाल दिलीप सहारे, ४७) भाष्कर सतिश हेडाऊ, वय ४७ वर्षे, ४८) मनिष सज्जन राहाटे, ४९) रजत रविंद्र लिंगाईत, ५०) किरण श्यामलाल समुद्रे, ५१) काशिनाथ सुकन हेडाऊ ५२) मनोज बाळकृष्ण सहारकर, ५३) श्रीमती चंद्रकला दिगांबर कुटे, ५४) खुशाल वाबुराव नान्हे, ५५) आकाश गंगाधर उरकुडे, ५६) जग्गु अरूण शाहु, ५७) सुशिला जरतार पवार, ५८) अनिकेत गोविंदाजी लोखंडे,५९) सुनिल सुर्यमान कन्नाके, ६०) जगदीश एनचा पवार या ६० गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे. **पोलीस स्टेशन भिवापुर :—** पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत १) अजय गणपत पराते,२) राजेश पुरुषोत्तम पाटील, ३) निखील

गोपीचंद समर्थ, ४) महेश नारायण मुत्तलवार, ५) करण नरेंद्र धनविजय, ६) दिगांबर मोरकु मेश्राम,७) सचिन बाळकृष्ण शंभरकर, ८) बाल्या ऊर्फ मिलींद दयाराम मेश्राम, ९) सचिन श्रीपत लोखंडे, १०) प्रविण लक्ष्मण मुन, ११) राजु नागोजी शेंडे, १२) महेंद्र देवाजी गजभिये, १३)गजानन मधुकर वारजुरकर, १४)संगिता प्रमोद राऊत, १५) जयकलम मधुकर वारजुरकर, १६)अनिल सुरभी सोलंकी, १७)इसमान बिसन पेंदाम, १८) सुभाष बालकदास गजभिये, १९)अकरम अहमद खॉ पठाण, २०)सुधाकर राजेराम ऊके, २१) ताराचंद गोमाजी मंडपे ,२२)प्रतिभा सचिन शंभरकर, २३)कवडु रामप्रसाद पवार, २४) क्रिष्णा मुत्तया गुंडलवार,२५)संजय ऊर्फ नाना माणिक शेगावकर, २६)नारायण वासुदवे तरारे, २७)सुनिल गोविंदराव बुचे,२८)अरविंद रमेश सोनडवले, २९)अंकुश नारायण माकडी, ३०)विनोद प्रभाकर पाटील, ३१)प्रमोद नत्थुजी जांभुळकर, ३२)चंदु लेदाडे, ३३)संजय पंढरी वारजुरकर, ३४)कवडू रामप्रसाद पवार, ३५)युवराज गुलाब नान्हे, ३६) पतिराम डोनू टेकाम ३७) सुनिल रामचंद्र मेश्राम, ३८) इमरतसिंग प्रितमसिंग बावरी, ३९) मंजिता सरनाज राजपुत,४०) चेतन पांडूरंग ठवकर,४१) संदेश ऊर्फ टायसन प्रकाश आंबुलकर, ४२) कर्मविर राजन कलसे, ४३) नितीन विठ्ठल कोडापे, ४४) मोरेश्वर तिमाजी चांदेकर, ४५) शिवचंद रामाजी चौधरी, ४६) वनवास गुलाब गायमुखे, ४७) प्रज्वल गजानन गोडे, ४८) रामपाल जयराम श्रीरामे, ४९) रमा अनिल सोलंकी, ५०) राहूल श्रावण मोहोड, ५१) गौतम जंगलु येवले या ५१ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास केला प्रतिबंध आहे. **पोलीस स्टेशन कुही :—** पोलीस स्टेशन कुही अंतर्गत १) जगदीश चिंतामण वारसागडे, २) जिवन गौतम वारसागडे, ३) दिनेश मुरलीधर पोहनकर, ४) आशिष ऊर्फ खुशबु सुरेश पिल्लेवान,५) विनोद मधुकर डहारे, ६) इश्वर मधुकर कांडरकर ७) मनोज छन्नुलाल वारसागडे, ८) छाया प्रेमदास कामठे, ९) नंदा गौतम वारसागडे, १०) दामा जगन लांजेवार, ११) अभिशेख विष्णू गजभिये, १२) आकाश ऊर्फ तरी गुलाब लेंडे, १३) रंजना मनोज बारसागडे, १४) शिशुपाल राजेंद्र मांढरे, १५) राकेश विठोबा पिदुरकर, १६) संदेश नामदेव आंबेकर, १७) आकाश श्यामराव मांढरे, १८) नारायण झिबल दुधपचारे, १९) नाना ऊर्फ ज्ञानेश्वर मुरलीधर पोहनकर, २०) कुलवंता प्रेमदास बोरकर,२१) हिमांशु प्रेमदास बोरकर,२२) विशाल ऊर्फ टेकचंद नत्थुलाल जैस्वाल, २३) विजय हरीभाऊ मांढरे, २४) कल्पना कुंडलीक मांढरे,२५) तुलाराम तुळशिराम चाचेरकर, २६) हरीदास मोतीराम मांढरे या २६ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे. **पोलीस स्टेशन वेलतुर :—** पोलीस स्टेशन वेलतुर अंतर्गत १.राजेश नत्थुजी देवारे,२.प्रविण महादेव देवारे, ३.ताराचंद नत्थुजी पाटील, ४.प्रतिभा भमराव गोंडाणे, ५.गुरुदेव रामचंद्र ढेंगे, ६. विजु दाजीबा कुकडे, ७.सचिन मोहन नौकरकर, ८.नत्थु हनुमान गायधने, ९.चंद्रशेखर भाऊराव चनोडे, १०. अंजु सोमकुवर ११.अंकुश बावाजी बावने, १२.नलुबाई ताराचंद पाटील, १३.किसन भदुजी देवगडे,१४.धनपाल ऊर्फ साधू तेजराम सोनबावणे, १५.वाल्मीक देवाजी रामटेके, १६.मुकेश चिंतामण नागोसे १७.संजय रामदास ठाकरे १८.रामु दयाराम उके, १९.नथाबाई बंडूजी मेश्राम,२०. सुनिल बुधाजी मांढरे, २१. अयुर भगवान थोटे, या २१ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे.**पोलीस स्टेशन पाचगाव** :— पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत १.चंदा राजेश शर्मा,२.निता ग्याणी पवार ,३.रोशनी शैलेश राजपुत, ४.यश दिनेश बावरीया, ५.आदित्य देविदास कुरूडकर, ६. विकास पुरूषोत्तम जिचकार, ७.तुषार बारसु नेवारे , ८.सुरेश शरद बुटले, ९.नारायण फकीरा छापेकर, १०.सुनिल जालंधर परतेकी, ११.भारती जितेंद्र पवार १२.पार्वताबाई किशोर टेकाम, १३. चेतन सुरेश बावरिया, १४.अमित नरेंद्र बोबडे, १५.प्रज्वल प्रकाश गिरी या १५ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास केला प्रतिबंध आहे.

**कन्हान उपविभाग**

**पोलीस स्टेशन मौदा** :— पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत १).पंकज मुकुंद पोटभरे २).विष्णु भोजराज मारबते,३).राजू श्रीराम मारबते,४).मिथुन शेषराव वाघमारे,५).लंकेश गणेश बांते,६).भगवान वासुदेव म्हस्के ,७).उमेश दिलीप शेटे, ८).प्रकाश महादेव बोरकर ,९).भूषण महादेव रामटेके ,१०).देवानंद गणपत तिरबुळे ,११).विलास सूर्यभान वासनिक, या ११ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला

आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** :— पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत १) राधेश्याम बंडोजी मेश्राम ,२)तुषार तुळशीराम वानखेडे ,३)निखिल अनिल गजभिये, ४)संजय शामलाल गुप्ता, ५) रमेश गोविंदराव ढोमणे ,६) हर्षल दत्तराज डांगोरे ७) चंदारी निनकू सहानी ,८) यश मुकेश महातो ,९) पियुष शेंडे या ९ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे.**पोलीस स्टेशन वडोदा** :— पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत १.शंकर नथुजी दारोटे २. तुषार शामराव काळे ३. सचिन शिवराम मकराम या ३ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे.

**नागपुर उपविभाग**

**पोलीस स्टेशन बोरी** :— पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत १) अरविंद राजू आलोसियात,२) ज्ञानेश्वर सोमाजी मसराम,३) सोनू शेखर मायकल या ३ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे. **पोलीस स्टेशन बेला**.:— पोलीस स्टेशन बेला १) सचिन सुधीरसिंग टाक,२) रविंद्र रामदास आंबाडे,३) दिनेश धनराज चवरे ,४) अविनाश नारायण म्हसकर,५) अनिल सोमाजी घोडे,६) इम्तियाजुल्ला सैफुल्ला खाँ पठाण,७) सेवासिंग मुन्सीसिंग बावरी,८) गजानन जागोजी बावणे ,९) रूषीकेश शरद हिंगणीकर , १०) आयुष अरूण जैस्वाल ११) भोजराज उर्फ कालु धनराज पराते या ११ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे.

**रामटेक उपविभाग**

**पोलीस स्टेशन रामटेक** . :— पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत १) हमदास ताराचंद मेहरकुडे ,२) लोकेश रामदास ढोबळे ,३) निकुंज जयसिंग गराडे ,४) रवींद्र श्रीराम सहारे या ४ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे. **पोलीस स्टेशन पारशिवणी**.:— पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत १.राहुल कलम तोमर,२. सुनील राधेश्याम पुसदकर , ३.रोशन श्रावण रंगारी , ४.व्यंकटेश माणिक चौधरी, ५.राजकुमार सावजी महेलवंशी, ६.शिशुपाल कवडू चव्हाण, ७.सुबोध बाबाराव लांजेवार, या ७ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.**पोलीस स्टेशन देवलापार.** :— पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत १.मनोज बाळकृष्ण नान्हे, २.परसराम दयाराम सूर्यवंशी, ३.रणवीर यशवंत कोडवते, ४. धनवीर माणिक कोडवते या ४ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.**पोलीस स्टेशन अरोली** :— पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत १.कांताराम राजेराम श्रावणकर २.अजय कीसन तांडेकर ३.अनिल भिमराव कुंभरे ,४.सनिल फततुंजी लसनते ,५ कमलेश कपुरचंद भगत ६.सचिन रामेश्वर उके,७. महेंद्र कीसन तांडेकर,८.महावीर मुरलीधर डेकाटे, ९. शिवचंद सोमा खांडके या ९ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.

**सावनेर उपविभाग**

**पोलीस स्टेशन सावनेर** :— पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत १) निरज बाबा यादव, २)नसीर असलम शहा अब्दुल बानवा ,३) प्रणेश उर्फ प्रणय संजय बनाईत ,४) बालक राम दिमागचंद मेहंदोले ,५) प्रद्युमान उर्फ दत्तू गुरु शंकर चौर्या आणि ६) अमन आसाराम धनोले या ६ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत १) चुहा उर्फ प्रदीप सुशील चौव्हान,२) अजमेरसिंग धरमसिंग अंधरेले,३) उजागरसिंग धरमसिंग अंधरेले, ४) गोविंदसिंग मोतीसिंग बावरी, ५) दिलदारसिंग मायासिंग भादा, ६) विजय दिगांबर महाजन, ७) सुरज राजकुमार मेश्राम, ८) शुभम अनिल कातकाडे, ९) इमरान रहीम पठान, १०) तेजराम उर्फ सचीन हरिदास नारनवरे , ११) दिनेश उर्फ दिन्या लक्ष्मन भोसले , १२) अशोक निलचंद सहारे, १३) प्रकाश उर्फ छोटु महादेव पाटील ,१४) ईशाक मोहम्मद सैयद, १५) सुभाष गुरुदास निखाडे या १५ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.**पोलीस स्टेशन खापा** :— पोलीस स्टेशन खापा

अंतर्गत १)छोटू बब्बू शेख, २)आकाश बल्लूजी चौधरी, ३)विना ज्ञानेश्वर बोरकर, ४) अमोल चिंतामण पुडके, ५)शैलेश भीमराव भालेराव, ६)भुजंग मंगल धुर्वे ,७)मायगो मधुकर वरखडे, ८) श्रीराम वसंता गजभिये, ९)मिलिंद अरविंद धार्मिक, १०)जीवन शंकर कोल्हे ,११)राजेश मधुकर बारापात्रे, १२)छोटू उर्फ मृणाल विलास हरडे, १३)अक्षय उर्फ कोमल दीपक लखपती १४)रावजी मोहन परतेकी, १५)अनिकेत साहेबराव कावनपुरे, १६)हर्षल प्रदीप मोहटे या १६ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.**पोलीस स्टेशन मोहपा**:— पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत १) अविनाश संजय पवार,२) अमित चंद्रपाल राजपूत ३) संदीप दिलीप राजपूत ,४) पिंटू उर्फ लाला नरेंद्र महापुरे या ४ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.

**काटोल उपविभाग**

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत १)योगेश भीमराव चंद्रिकापुरे, २) दीपसिंग जोगेंद्रसिंग भादा,३)लोकेश उर्फ गोच्या दुर्गेश वाघाडे ,४)सचिन उर्फ ओम प्रकाश तेजराम गुजवार ,५)प्रेमसिंग करमसिंग भादा ,६)सिद्धेश्वर कृष्णाजी गजभिये,७)रवी यल्लाप्पा उत्तमवार, ८)सुभाष शामरावजी उईके ,९)सोनू धर्मराज गुजवार ,१०)रुपेश रामराव बोरकर ,११)शोभा अरुण शेंद्रे, १२)माला रमेश गजभिये १३)मायाकौर जसबीरसिंग भोंड ,१४)मनोज मदना पवार १५) ज्ञानेश्वर उर्फ केन वासुदेव गायकवाड ,१६)अशोक नथुजी सुरजुसे ,१७)आशिष हरिश्चंद्र मने ,१८) पितांबर राघोबा गायकवाड ,१९)जसबीरसिंग जतनसिंग गोंड ,२०)देवेंद्र जतनलाल पवार ,२१) भारत ईश्वर खडसे ,२२)आकाश रवींद्र बागडे ,२३) दीपक हरिदास तागडे ,२४)गोविंद बाबाराव मानकर या २४ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.**पोलीस स्टेशन नरखेड** :— पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत १) सौ उषा सुधाकर शेंबेकर २) रोशन नरेश धुर्वे,३) नामदेव संतोष सोनेकर ४) बिरबल जंगला सोनबरसे, ५)खुशाल उर्फ शांती काशीराम उईके, ६) देविदास बिरबल सोनबरसे ७)भगवान विष्णूजी ठोंबरे, ८)जुगलकिशोर रामदास जैस्वाल, ९)नरेश माणिक चव्हाण १०) कमलाबाई ज्ञानेश्वर कवडती ,११)नरेश नत्थुजी दुर्वे, १२)बंडू उर्फ उत्तम कृष्णराव मस्के, १३) धनराज भाऊराव चौधरी, १४) प्रवीण अशोक बोरडे, १५)राजेंद्र उर्फ जग्गू भोजराज कळमधाड, १६) नरेंद्र भोजराज कळमधाड या १६ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे.**पोलीस स्टेशन जलालखेडा**:— पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत १) मनोज नारायणप्रसाद शर्मा, २)केवलसिंग देवसिंग बावरी,३) दिलीप रामराव कुमरे,४) त्रिकेश प्रमोद सोनुले,५) ईश्वर गुलाब खोडे,६) प्रकाश लक्ष्मण कठाणे, ७) साहेबराव विठोबा मोरे,८) किशोर बालाजी ढबाले ,९) अनिल साहेबराव खडसे ,१०) प्रवीण उत्तमराव सोनुले या १० गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** :— पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत १) धरमसिंग प्रीतमसिंग भोंड ,२) दीपसिंग आनंदसिंग भोंड,३) रतनसिंग सोहनसिंग भोंड ,४) श्रावण बापूरावजी अंबुदारे ,५) गफार अकबर अन्सारी,६) मनोज दशरथ शुक्ला,७) रोहिदास ममराज राठोड ,८) सौरभ उर्फ मुंटू प्रकाश डोके ,९) संग्राम सिंग दीपक सिंग भोंड या ९ गुन्हेगारांना हद्दीत प्रवेशास प्रतिबंध केला आहे.

**नागपूर ग्रामीण पोलीस प्रशासनाने उत्सव काळात कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणाऱ्या ३४० सराईत गुन्हेगारांविरूध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (२) अंतर्गत व्यापक प्रतिबंधात्मक हद्दपार कारवाई केली आहे.**

## ॲल्युमिनीअम तार चोरीचे ०९ गुन्हे उघड, ०३ आरोपीतांना अटक,
## ११ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एम.एस.ई.बी चे विदयुत वाहीनी करिता वापरण्यात येत असलेले ॲल्युमिनिअम तार चोरीचे ०९ गुन्हें उघडकीस आणुन एकुण ३ आरोपींना अटक केले आहे. आरोपीतांकडुन ११ लाख ६५ हजार ५०० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक २३/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी सुंदरसिंग हरनामसिंग जुनी याने त्याचे साथीदारांसह सदर गुन्हा केल्याची माहीती प्राप्त केली. तसेच आरोपी सुंदरसिंग हरनामसिंग जुनी महींन्द्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच–४९/सी डब्ल्यु–०२०३ व त्याचे दोन साथीदारासोबत एमआयडीसी हिंगणा परिसरात असल्याची खात्रीशीर माहीती मिळाल्याने आरोपीचा शोध घेतला असता एमआयडीसी हिंगणा निलडोह आर्यन फॅक्टरी रोड येथे आरोपी **१) सुंदरसिंग हरनामसिंग जुनी, वय ४४ वर्ष, रा. प्लॉट नं. ३८, आझाद नगर, चेरी कंपनी जवळ, बिडगाव ता. कामठी जि. नागपुर २) सज्जनसिंग नानकसिंग जुनी, वय २५ वर्षे रा. प्लॉट नं. ६१, आझाद नगर, चेरी कंपनी जवळ, विडगाव ता. कामठी जि. नागपुर ३) मुकेशकुमार रूपसाय ठाकुर (वरचुठाकुर) वय २६ वर्ष, रा. झोपटोला थाणा अबांगड चौकी, जि. मोहला, रा. छत्तीसगड ह.मु. प्लॉट न.३८, आझाद नगर, चेरी कंपनी जवळ, विडगाव ता. कामठी जि. नागपुर** हे तिघे मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी जाने. २०२६ ते सप्टेंबर २०२६ पासुन पोलीस स्टेशन सावनेर, कळमेश्वर, केळवद, मोहपा कोंढाळी, कन्हान, अरोली परिसरात एम.एस.ई.बी चे विदयुत वाहीनीचे काम सुरू असलेल्या ठिकाणावरील लोंखडी पोल वरून तसेच एमईसीबीचे खुल्या आवारातील अल्युमिनीअम तार चोरीचे गुन्हे केल्याची माहीती दिली. सदर गुन्हयातील **आरोपी क्र. १) ते ३) यांना अटक करण्यात आली आहे.**

पोलीसांनी आरोपीतांकडुन १) गुन्हयात वापरलेले वाहन व लोखंडी कटरसह एकूण किंमती ११,६५,५००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त केला असुन खालील ०९ गुन्हे उघडकीस आणले आहे.

उघडकीस आलेले गुन्हे

१) पोलीस ठाणे कोंढाळी अप. क्र. ४१/२६ कलम ३०३(२) भान्यास
२) पोलीस ठाणे कोंढाळी अप. क्र. ४४/२६ कलम ३०३(२) भान्यास
३) पोलीस ठाणे कळमेश्वर अप. क्र. २६५/२६ कलम ३०३(२) भान्यास
४) पोलीस ठाणे कन्हान अप. क्र. २३७/२६ कलम ३०३(२) भान्यास
५) पोलीस ठाणे अरोली अप. क्र. २७५/२६ कलम ३०३(२) भान्यास
६) पोलीस ठाणे केळवद अप. क्र. ३२७/२६ कलम ३०३(२) भान्यास
७) पोलीस ठाणे मोहपा अप. क्र. २१/२६ कलम ३०३(२) भान्यास
८) पोलीस ठाणे मोहपा अप. क्र. ९४/२६ कलम ३०३(२) भान्यास
९) पोलीस ठाणे सावनेर अप. क्र. ७२२/२६ कलम ३०३(२) भान्यास



# दुचाकी चोरीचे गुन्हे उघड, आरोपी अटक
# ४ दुचाकी असा १ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त
# एमआयडीसी बोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक २३/०९/२०२६ रोजी एमआयडीसी बोरी पोलीसांनी दुचाकी चोरीचे गुन्हे उघड करून एकुण ४ दुचाकी जप्त करत आरोपीला अटक केले आहे.

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत दाखल अउघड गुन्हयाचा तपास करीत असतांना एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी **राज गुलाब कटरे वय २३ वर्ष रा. वाटेघाट, ता. हिंगना** याला निष्पन्न केले. दिनांक २३/०९/२०२६ रोजी आरोपीला टाकळघाट येथुन ताब्यात घेवुन त्यास कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने त्याच्या साथीदारासह दुचाकी चोरीचे गुन्हे केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीने चोरी गेलेल्या **एकूण ४ दुचाकी (मोटारसायकल) किंमती १,८०,०००/— रूपयांचा** मुद्देमाल जप्त केला आहे.




## कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद.

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक २३/०९/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा नरेंन्द्र बावणे याचे घराजवळ सुंदरगाव येथे कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौदा पोलीस घटनस्थळी पोहचले असता, मौजा नरेंन्द्र बावणे याचे घराजवळ सुंदरगाव येथे खाली जागेत काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. आरोपी क्र **१) संदिप मारोतीराव बावणे, रा. केसलापुर २) निलेश बबन काबळे, रा. केसलापुर ३) मयुर वैदय, रा. सिंगोरी ४) चंद्रशेखर रामचंद्र ठाकरे, रा. बोरी राणे पारशिवनी हे घटनास्थळी मिळुन आले.** हे घटनास्थळी मिळुन आले.

**आरोपीच्या ताब्यातून रोख ५१०/— रूपये, ३ कोंबडे प्रत्येकी ५०० रूपये प्रमाणे १५००/—रूपये, मोटर सायकल क्र एम. एच.—४०/बी.झेड—३४३८ आणि एम.एच. —४०/सी. एल —७८४३ किंमती ३३,०००/—रूपये असा एकुण — ३५,०१०/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपीतांविरूध्द कलम १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २३/०९/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा नायगाव, त. काटोल येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे काटोल पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी आरोपी नामे **१) शिवराजसिंग सतनामसिंग अंद्रेल, वय ३२ वर्ष, रा. ठानेगाव, त.कारंजा, जि.वर्धा २) गोपाल लक्ष्मण सिडाम, वय ३५ वर्ष, रा. अर्जुननगर, काटोल, त. काटोल, जि. नागपूर ३) राहुल राजु ठाकरे, वय ३० वर्ष, रा. गळपुराचौक, काटोल, त.काटोल, जि. नागपूर ४) प्रशांत महादेव बागडे, वय ३० वर्ष, रा. शिख मोहल्ला जवळ, पंचवटी, काटोल, त.काटोल, जि. नागपूर ५) महेश ज्ञानेश्वर चोंदे, वय ३० वर्ष, रा. सुशिलापुरम, सावरगाव रोड, काटोल, त.काटोल, जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम २९५०/—रूपये, असा एकुण २९५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर ०८ गुन्हे नोंद, ०६ लाख ४४ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक २३/०९/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा शिवारात मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे अशा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीसांनी दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांच्यासह मौजा गोंडखैरी पारधी बेडा शिवारात अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांवर कारवाई करत घटनास्थळावरी रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**एकुण ०८ आरोपी यांचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १५४०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि २३० लिटर मोहाफुल गावठी दारू, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. पोलीसांनी घटनास्थळावरून आठही कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १५४०० लिटर मोहाफुल सडवा, २३० लिटर मोहाफुल गावठी दारू, प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ६,४४,२००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०८ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

# अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर २३ गुन्हे दाखल, ६ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २३/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २३ गुन्हे दाखल केले.

**पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०८ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** अंतर्गत ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत** ०१ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत** ०८ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३०६० मिली देशी दारू, १८९ लिटर मोहाफुल दारू, १५६०० लिटर मोहाफुल सडवा असा एकुण ६५६८१०/– रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर